RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २२

दि. १० मे २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त


E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# व्ही एस पँथर्स चा सर्वधर्मीय सामुहीक विवाह सोहळा आज

## सर्व लातूरकरांनी उपस्थित रहावे – विनोद खटके

**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३५ व्या जयंतीनिमित्त सातवा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे हा विवाह सोहळा डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर या ठिकाणी संध्याकाळी सात वाजता संपन्न होणार आहे या विवाह सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री



बाबासाहेब पाटील राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट माजी मंत्री संभाजीराव पाटील माजी मंत्री अमित देशमुख , माजी मंत्री संजय बनसोडे आमदार अभिमन्यू पवार साहेब लातूर ग्रामीणचे आमदार रमेश आप्पा कराड शिक्षक आमदार विक्रम काळे तसेच विशेष सत्कारमूर्ती म्हणून लातूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक इंजी अनिल कुमार गायकवाड हे उपस्थित राहणार आहेत. या विवाह सोहळ्यामध्ये विविध जाती धर्मांचे ३६ जोडपे विवाहबद्ध होणार आहेत या नवदांपत्यांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी सर्व लातूरकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी शहराध्यक्ष असद भाई शेख कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड ऑटो युनियन शहराध्यक्ष जगदीश सरवदे विलास कसबे ऋषी ढगे महादेव कांबळे रितेश जांभळे यासिन शेख ,अतुल होळकर ,मनोज गायकवाड, रवि कांबळे ,सुरज सूर्यवंशी आदींनी केले आहे.



## संपादकीय...

### भविष्यातील धोक्याची घंटा...

युद्धाच्या मैदानावर अनेक डावपेच आखले जात असतात. जेव्हा पराभवाचे सावट गडद होणार असे दिसू लागते, तेव्हा काही पावले माघार घेणे ही युद्धनीतीच असते. पण अशी माघार हा पराभव नसतो. भारतातून माओवाद संपल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्र्यांनी संसदेत केला, तेव्हा युद्धनीतीच्या या डावपेचांची त्यांना नसेल असे नाही. माओवादी लढाईचा नवा मार्ग शोधून काढतील आणि त्याला तोंड देण्यासाठी नवी रणनीती आखावी लागेल, याचीही सरकारला पुरेपूर जाणीव असेल. म्हणूनच माओवाद संपल्याचे जाहीर केल्यानंतर केंद्र सरकार स्वस्थ बसलेले नाही. नवा संघर्ष सुरू करण्याची माओवाद्यांची तयारी असणार, याचे संकेत आता मिळू लागले असून त्यास तोंड देण्यासाठी तयारी लागणार, हे केंद्र सरकारचे आडाखे अचूक असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. अनेक बिनीच्या मोहर्यांची शरणागती आणि सशस्त्र संघर्षाकरिता असलेल्या ताकदीचे खच्चीकरण यामुळे खिळखिळ्या झालेल्या माओवाद्यांनी गनिमी काव्याने चळवळ चालविण्याची तयारी केली आहे. तेलंगणातील माओवाद्यांनी प्रसिद्धी पत्रक जारी करून संघर्षाचा नवा पवित्रा जाहीर केला आहेच; पण आत्मसमर्पण करणार्या नेत्यांवर आगपाखड सुडाचे नवे सत्र आरंभण्याचा इशारा देऊन नव्या रक्तरंजित संघर्षाचे संकेतही दिले आहेत. माओवाद संपलेला नाही, तर तो अस्तित्वहीन झाला आहे. ही या चळवळीची तात्पुरती माघार असून अधिक सावध राहावयास हवे, असा इशारा देणार्या या पत्रकातून उमटणार्या भविष्याच्या हाका सावधपणे ऐकाव्या लागतील. एकेकाळी देशातील १८० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पसरलेला माओवादी 'रेड कॉरिडॉर' आता केवळ काही मोजक्या भागांत मर्यादित राहिला आहे. माओवादी किंवा नक्षलवादी चळवळ सध्या तिच्या इतिहासातील सर्वांत कठीण आणि निर्णायक टप्प्यावर उभी आहे. भारत 'नक्षलवाद मुक्ती'च्या मार्गांवर दाखल झाल्याची आनंदवार्ता केंद्र सरकारने संसदेच्या अधिवेशनात देशाला दिली.छत्तीसगडमधील सुकमा आणि विजापूर यांसारख्या अत्यंत दुर्गम भागांतील अस्तित्वाच्या काही खाणाखुणा वगळता, माओवाद्यांचा भागांतील सशस्त्र प्रभाव जवळपास संपुष्टात आला आहे. नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या आता शून्याच्या जवळपास पोहोचल्याचा गृह मंत्रालयाचा अहवाल आहे. 'सीपीआय (माओवादी)' या प्रतिबंधित संघटनेची केंद्रीय समिती आणि पोलिटब्युरो आता पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मे २०२५ मध्ये नंबाला केशव राव याचा मृत्यू आणि २०२६ च्या सुरुवातीला थिप्पिरी तिरुपती याने केलेले यांमुळे संघटना 'नेतृत्वहीन' अवस्थेत आहे. सुरक्षा दलांनी दुर्गम भागात 'फॉरवर्ड ऑपरेटिंग बेसेस' स्थापन केल्यामुळे नक्षलवाद्यांचे भौगोलिक कवच नष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांत ४८०० हून अधिक कडव्या माओवाद्यांनी शस्त्रे टाकून सरकारसमोर आत्मसमर्पण केले आहे. महाराष्ट्रात, विशेषतः गडचिरोली जिल्ह्यात तर ही चळवळ शेवटच्या घटका मोजत आहे. अनेक आदिवासी गावांनी नक्षलवाद्यांना नाकारून 'गावबंदी' जाहीर केली आहे. नक्षलग्रस्त भागांत विकासाचे वारे वाहू लागले आहेत. रस्ते, पूल आणि मोबाईल टॉवर्सच्या जाळ्यामुळे नक्षलवाद्यांची रसद आणि माहिती मिळविण्याचे मार्ग बंद झाले आहेत. गोंदिया आणि चंद्रपूर यांसारख्या जिल्ह्यांत आता केवळ माओवादाचे अवशेष दाखविणार्या काही खाणाखुणा उरल्या आहेत; त्यांच्याकडे सक्रिय सशस्त्र तुकड्या नाहीत. तथापि, अजूनही या उभी केलेली काही आव्हाने कायम आहेत. सशस्त्र लढा कमकुवत झाल्यावर विचारधारेचा प्रसार करण्यासाठी शहरी भागातील छुप्या नेटवर्कचा वापर वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जोपर्यंत दुर्गम भागातील आदिवासींच्या जमिनीचे प्रश्न, जल-जंगल-जमीन यांवरील हक्क आणि स्थानिक असंतोष पूर्णपणे दूर होत नाही, तोपर्यंत ही विचारधारा सुप्त स्वरूपात जिवंत राहू शकते. भविष्यात ही हिंसक संघर्षापेक्षा राजकीय किंवा सामाजिक आंदोलनाच्या छुप्या स्वरूपात टिकून राहण्याचा प्रयत्न करू शकते, हे ओळखून केंद्र सरकारने टाकलेली पावले आणि हिंसाचाराची शक्यता नजरेआड न करता नक्षलग्रस्त भागांत वाढविलेली सुरक्षा ही आश्र्वासक बाब ठरते.

चरेळीीं केंद्रीय गृहमंत्र्यांनी नक्षलवाद मुक्तीसाठी आखलेली रणनीती आणि मार्च २०२६ पर्यंतचे लक्ष्य यावर संसदेत दिलेले सविस्तर स्पष्टीकरण शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांची वाढती संख्या हे या चळवळीच्या पतनाचे एक मोठे लक्षण नक्कीच आहे, परंतु सुरक्षा यंत्रणांनी 'लष्करी विजय' मिळविल्यानंतर आता वैचारिक अस्तित्व टिकविण्याचे अस्त्र या चळवळीने परजले आहे. हे खरे आहे की, मोठ्या प्रमाणावर होणार्या शरणागतीमुळे चळवळीला धक्के बसले आहेत. जेव्हा पहिल्या फळीचा एखादा नेता शरणागती पत्करतो, तेव्हा फळीचा विश्र्वास डळमळीत होतो. शरणागती पत्करलेले नक्षलवादी पोलिसांना त्यांच्या गुप्त तळांची, शस्त्रास्त्रांच्या साठ्यांची आणि 'लॉजिस्टिक' पुरवठ्याची अचूक माहिती देतात. यामुळे सुरक्षा दलांना मोठे यश मिळत आहे; सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे नक्षलग्रस्तांनाही नक्षलवादी विचारधारेपेक्षा विकासाचा मार्ग अधिक आश्र्वासक वाटू लागला आहे. मैदानावर सशस्त्रपणे लढताना माघार घ्यावी लागते, तेव्हा चळवळीचा मार्ग बदलला जातो. छत्तीसगड आणि ओडिशाच्या सीमेवरील अबुझमाडसारखे काही भाग अजूनही अत्यंत दुर्गम आहेत. तिथे सशस्त्र तुकड्या पूर्णपणे नष्ट झालेल्या नाहीत. त्यामुळे देश नक्षलवाद मुक्त झाल्याचे सरकारने जाहीर केल्यानंतरही, माओवाद्यांचे अस्तित्व पुसले गेले, असे म्हणता येत नाही. म्हणूनच आता अधिक सावधपणे छुप्या चळवळीचा सामना करण्याचे आव्हान सरकारसमोर उभे आहे. ही केवळ तात्पुरती माघार असल्याने सद्यस्थितीत ही चळवळ काहीशी 'अप्रासंगिक' ठरली आहे, याची नोंद घ्यावयास हवी. सशस्त्र लढाईतील संघर्षात माओवाद्यांशी सामना करणारे प्रगत तंत्रज्ञान सुरक्षा यंत्रणांकडे उपलब्ध आहे. ड्रोन, उपग्रहांमार्फत उपलब्ध होणारी माहिती आणि मोबाईल संपर्क यंत्रणांनी सज्ज असलेल्या सुरक्षा दलांच्या अत्याधुनिक तंत्रामुळे माओवाद्यांच्या जंगलातील लढायांच्या कारवाया निकामी आहेत. यापुढे या लढाईचे तंत्र बदलण्याचा गनिमी कावा पुढच्या संघर्षात वापरला जाईल, असे नव्या आखणीतून दिसू लागले आहे. यापुढची चळवळ कदाचित हिंसक स्वरूपात नसेल, पण राजकीय प्रतिकार म्हणून जिवंत राहू शकते. तो प्रतिकार मोडून काढावयाचा असेल, तर गडचिरोलीमध्ये राबवण्यात आलेले आत्मसमर्पण आणि पुनर्वसन मॉडेल हा प्रभावी उपाय आहे. केवळ जिल्ह्यात नव्हे, तर केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी हे एक दिशादर्शक उदाहरण आहे. या मॉडेलने माओवादी चळवळीचा कणा मोडला आहे. या नीतीतून सरकारने माओवाद्यांना केवळ शस्त्रे खाली ठेवण्यास सांगितले नाही, तर त्या बदल्यात सन्मानाने जगण्याची संधी दिली. पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने माओवाद्यांच्या विरोधात शस्त्र उपसण्यापेक्षा विश्र्वासाचे नाते निर्माण भर दिला. आदिवासींना जातीचे दाखले, रेशन कार्ड आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्यामुळे आदिवासी भागातील जनतेचा पोलिसांवरील विश्र्वास वाढला आणि नक्षलवाद्यांची माहिती देणारी यंत्रणा कमकुवत झाली. आत्मसमर्पण केलेल्या तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगाराशी जोडले गेले. माजी माओवाद्यांना गावाच्या कारभारात नेतृत्व करण्याची संधी दिसू लागली. हा बदल पचवून चळवळ जिवंत माओवाद्यांची धडपड सुरू झाली आहे. आता यापुढचा लढा शस्त्रांचा राहिला नसून विकासाचा आहे. गडचिरोलीत सुरू असलेले लोखंडी खाणींचे प्रकल्प आणि रस्ते बांधणीची कामे यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार मिळत आहे. जोपर्यंत विकास तळागाळातील माणसापर्यंत पोहोचत राहील, तोपर्यंत माओवादी चळवळ पुन्हा उभी राहणे कठीण आहे. सावध राहावयास हवे. कारण भविष्यातील धोक्याच्या वाजण्यास सुरुवात झालेली आहे.

# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार - पणन मंत्री जयकुमार रावल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र राज्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

पणन संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, संबंधितांना वेळोवेळी सूचना देऊनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनाने दि. ५ जुलै २०१६ आणि दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक




केले आहे. बाजार समितीकडून संबंधित परवाना धारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसले तरी कायद्यानुसार परवाना घेणे आवश्यक राहणार आहे.

कायद्यातील कलम ५ (ड) अंतर्गत थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मसाठी परवाना देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच इतर संबंधित घटकांनी आवश्यक परवानगीशिवाय शेतमाल व्यापार करू नये, अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिला आहे.

## भारत माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा ८१.२५% निकाल



**लातूर :** लेबर कॉलनी येथील भारत माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी- मार्च मध्ये झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ८१.२५% एवढा लागला आहे. इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा शुक्रवार दिनांक ८ मे २०२६ रोजी निकाल जाहीर झाला आहे भारत माध्यमिक या विद्यालयाचे विद्यार्थी प्रतीक्षा गोविंद सावळे प्रथम, स्वाती महादू कांबळे द्वितीय तर आत्तार आलिशा अकबर तिसरी आली. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बी.के. सूर्यवंशी, सचिव एल इ भागवत, मुख्याध्यापक सी. के. कुरूम यांनी पुष्पहार देऊन कौतुक केले. दहावी परीक्षेतील शाळेच्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यां च्या सत्कार प्रसंगी आर. जी.पवार, आर . जी.कांबळे, गीता होमकर मॅडम , पल्लवी सांडूर मॅडम, भस्मे सर तसेच पालक उपस्थित होते.

# अनुसूचित जाती आरक्षणाची अ ब क ड विभागणी ? ओबीसींची भूमिका काय असावी?- राजाराम पाटील

आरक्षण या विषयावर ओबीसी व्यक्त होताना दिसत नव्हता.जेव्हा उच्चवर्णीय जमीनदार,सत्ताधीश मराठ्यांनी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षणात घुसखोरी सुरू केली. त्यावेळी काही प्रमाणात ओबीसी जागे झाले.याच प्रमाणे आरक्षण ब्राह्मण क्षत्रिय वैश्य जातींनी कोणतेही आंदोलन,मागणी न करताच घेतले. त्यावेळी झोपलेले ओबीसी आरक्षणा बद्दल किंचित जागे झाले.उच्च जातींचे आरक्षणा बद्दल आकर्षण जागे झाले.नव्हे त्यांनी सामाजिक दृष्ट्या मागास नसताना,ओबीसींचे आरक्षण खाऊन टाकले.तेव्हा आरक्षणास ''अस्पृश्य'' समजणारे लोक थोड्या चिकित्सक पद्धतीने अभ्यास करू लागले.ओबीसींच्या या आरक्षणा बाबतीत दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीस कारण होते. उच्च जातींनी धर्माच्या प्रभावाखाली ओबीसींना बेसावध ठेवण्यात मिळविलेले भयानक यश होय.

देशातील ५२ टक्के ओबीसी हा देशातील एकूण लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग पूर्वी ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांचा गुलाम होता.आजही तो गुलामच आहे.महात्मा जोतिबा फुले यांनी शूद्र जातींची मानसिक धार्मिक गुलामी सोप्या पद्धतीनी समजावून सांगितली आहे.वैदिक ब्राह्मणी हिंदू धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या ओबीसींना महात्मा फुले या आधुनिक विचारवंत महापुरुषांची धर्मचिकित्सा पचविणे पूर्वी अवघड होते.आजची महाकठीण वाटते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरु मानून धर्म चिकित्सक तथागत गौतम बुद्ध आणि संत कबीर यांच्या बरोबरीचे गुरुतुल्य स्थान दिले आहे.तेहतीस कोटी देव आणि ब्राह्मण, वेद,उपनिषदे, पुराणे या धर्मभावनेत गुंतलेल्या शूद्र (ओबीसींना) जागे करण्याची प्रक्रिया देशात अत्यंत ताकदीने होणे आजही गरजेचे आहे.

मनुस्मृती नुसार चातुर्वर्ण्य पद्धतीने ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या शोषक, लुटारू १५टक्के लोकांची सेवा करणे. हे वैदिक हिंदू धर्माने दिलेले काम विनातक्रार ओबीसी करत आले आहेत. देव धर्माचे आदेश पाळणे. हेच जीवन कर्तव्य मानणाऱ्या शूद्र लोकांना जागे करण्याचा प्रयत्न २५०० वर्षापासून बुद्ध,चार्वाक,महावीर यांनी चालविला आहे.अलिकडे फुले शाहू आंबेडकर यांनी हा विचार देशात रुजविण्यासाठी अपार कष्ट घेतले. अर्थात आमच्या महापुरुषांच्या विचारास थांबविण्यासाठी ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांनी धर्मसत्ता, राजसत्ता,अर्थसत्ता अशी वापरली आहे की,आमच्या महापुरुषांच्या मृत्यूनंतर त्यांचे कार्य लोकांपासून लपविण्यात मनुवादी व्यवस्थेस कायम यश आलेले दिसते.

ओबीसी एससी एसटी स्त्रिया यांच्या गुलामिस कारण वैदिक धर्म वेद उपनिषदे कथा पुराणे रामायण महाभारत ही महाकाव्ये आहेत. त्याच प्रमाणे मनुस्मृती नुसार मिळालेल्या धार्मिक,राजकीय,आर्थिक अधिकारांचा फायदा




ब्राह्मण क्षत्रिय वैश्य हे घेत आले आहेत.हे एक प्रकारचेउच्च जातींचे ''आरक्षण'' आहे.जे देशातील ८५ टक्के ओबीसींना एससी एसटी यांना त्यांचे सर्वाधिकार,प्रतिनिधित्व नाकारते.देशात आम्हा स्त्री शूद्र अतिशूद्र यांना मनुस्मृतीन गुलामी लादून आमचे शोषण केले. म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी मनुस्मृती जाळली.आमच्या गुलामीचे अशा ग्रंथातील संदर्भ शोधून ओबीसींनी वेद उपनिषदे रामायण महाभारत या ग्रंथांची चिकित्सा करून, त्यातील गुलामिस कारण असलेले ग्रंथ प्रातिनिधिक स्वरूपात अभ्यासले पाहिजेत. कारण ओबीसी जातींची गुलामी ही याच विषमतेच्या रूढी परंपरेतून मानसिक रित्या लादली गेलीय.

हिंदू वैदिक धर्माच्या गुलामीमुळे खचलेले,पिचलेले,शोषित शूद्र अतिशूद्र यांना ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या पुढारलेल्या जातींच्या बरोबर आणण्यासाठी त्यांना प्रतिनिधित्व देणे. म्हणजेच आरक्षण देणे. ही देशात समता निर्माण करण्याची प्रक्रिया डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सुरू केली आहे.भारताच्या संविधान सभेत ओबीसींसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रचंड विरोधास सामोरे जावे लागले.हा विरोध मुस्लिम ख्रिश्चन धर्मियांचा नव्हता.तर ओबीसींना प्रिय असलेल्या हिंदू ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या उच्चवर्णीयांचा होता. हा लेख जेव्हा तुम्ही तुमच्या फेसबुक व्हॉट्सअँप किंवा कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध कराल तेव्हा हेच उच्चवर्णीय हिंदू त्याला विरोध करतील.या सर्व लेखात मला हेच सांगायचे आहे.या देशातील ८५ टक्के ओबीसी एससी एसटी यांची आजची वाईट स्थिती ही ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांना धार्मिक राजकीय आर्थिक सर्वाधिकार धर्माने दिले. आम्हा शूद्र अतिशूद्र स्त्रिया यांना नाकारल्यामुळे झाली आहे.अर्थात हा विषय अभ्यासाचा भाग आहे.त्यासाठी बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांचे ग्रंथ वाचावे लागतील.जेवढ्या प्रमाणात आम्ही ओबीसी दासबोध रामायण महाभारत वाचतो.

देशात संविधानाने दिलेल्या आरक्षणामुळे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य चिडले आहेत.त्यामुळे ते मागासवर्गीय आरक्षणाची नेहमी कुचेष्टा करतात.त्यास सर्वात बळी पडतात धर्माचे बिनपगारी गुलाम आम्ही आगरी कोळी भंडारी कुणबी माळी धनगर ओबीसी हे ५२ टक्के लोक.देशातील प्रमुख राजकीय पक्ष काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी शिवसेना ही मंडळी म्हणजेच ब्राह्मण सीकेपी मराठा क्षत्रिय वैश्य हेच मनुवादी लोक आहेत.संविधानाने आम्हा ओबीसींना दिलेले आरक्षण संपविणे हेच त्यांच्या सत्तेचे खरे काम असते.आम्ही या छोट्याशा लेखातून हे शिकले पाहिजे.की ब्राह्मण क्षत्रिय वैश्य हे आमच्या समतेच्या तत्वातून मिळालेल्या आरक्षणाचे ''संघटित'' राजकीय,धार्मिक,आर्थिक शत्रू असतील तर आम्हास ''संघटित'' रहावे लागेल.जे आरक्षणाचे शत्रू आहेत.त्यांची अनुसूचित जाती म्हणजे जातींच्या आरक्षण विभाजनातून न्यायाची नीती असेल ? की अन्यायाची असेल?. हजारो वर्षांचा भारताचा विषमतेचा इतिहास हाच शोषक ब्राह्मण क्षत्रिय वैश्य जातींचा क्रूर इतिहास आहे.त्यामुळे केंद्रात असलेले आणि राज्यात असलेले सरकार हे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांचेच आहे हे सत्तेतील प्रमुख नेत्यांच्या संख्येतून तुम्हास कळले असेल.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजप हे मनुस्मृती समर्थक आणि आरक्षण विरोधक आहेत.

ओबीसींच्या आरक्षणाची विभागणी अगोदर झाली आहे.आम्हास तेव्हाही एक रहाणे गरजेचे होते.अर्थात ही गोष्ट समजून घेणारे नेतृत्व नव्हते. आज '''' समूह तोडला गेला .तर तो महाराष्ट्रातील आरक्षण विरोधी, ब्राह्मण मराठा वैश्य या सरंजामी जातींसमोर लढणार कसा? आरक्षण म्हणजे केवळ नोकरी शिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्था यातील राजकीय आरक्षण नाही.तर देशातील एकूण १०० टक्के साधन संपत्ती यातील जमीन, पाणी, जंगल,उद्योग,खनिजे,समुद्र,आकाश,धर्म,मिडिया, उद्योग,प्रशासन कला, चितपट, यातील ८५ टक्के आमचा म्हणजे शोषितओबीसी एससी एसटी यांचा वाटा मिळविणे होय.अन्याय करणारे, अत्याचार करणारे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य हे संघटित गुन्हेगार म्हणून हजारो वर्षे एक होऊन विषमतेसाठी लढतात.तर भारतीय सविधानिक समता लोकशाही यासाठी महात्मा जोतिबा फुले,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा स्त्री शूद्र अतिशूद्र भारत डॉ.बाबासाहे आंबेडकरांचा विचारांनी एक होऊनच लढला पाहिजे.मला असे वाटते.हे विचार तथागत बुद्ध,सम्राट अशोक,छत्रपती शिवराय,राजर्षी शाहू महाराज,लोकनेते दि.बा.पाटील या सर्वांचे आहेत.एससी आरक्षणाची विभागणी ही आमच्या आरक्षणात फूट पडण्याची प्रक्रिया आहे.त्याच प्रमाणे क्रिमिलेयर लावणे.ही आरक्षण संपवण्याची विकृती आहे.उच्चवर्णीय ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या विषमतेच्या विकृतीला भारतीय संविधानाच्या समतेनुसार पर्याय देणारी राष्ट्रीय एकता आम्ही शोषित स्त्रिया ओबीसी एससी एसटी यांनी एक होऊन निर्माण करायची आहे.याला आपला अमूल्य वेळ,पैसा,साधने आणि नेतृत्व आपण द्यावे.ही नम्र विनंती करतो.



आपला भाऊ.

**राजाराम पाटील- ८२८६०३१४६३.**

**उरण, जिल्हा - रायगड.**

## संक्षिप्त...

### स्वानंद सार्वजनिक वाचनालयात विविध सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न



**केज/प्रतिनिधी:** स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे ९ मे २०२६ रोजी महाराणा प्रताप जयंती, कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी, संत चोखामेळा पुण्याती थी संपन्न झाली.यावेळी व्याख्यान, पारिस परिसंवाद, चर्चासत्र, गीतगायन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. प्रमुख व्याख्याते म्हणून आनंद गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली. परिसंवादात पांडूरंग गायकवाड, संजय सोनवणे, आनंद गायकवाड यांनी सहभागी होवून मार्गदर्शन केले. चर्चासत्रात सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगन गायकवाड, बंडू पौळ, आनंद भैय्या गायकवाड यांनी सदभागी होऊन मार्गदर्शन केले. गीतगायन कार्यक्रमात शिवम गायकवाड, वेदिका गायकवाड, प्रतिक पानढवळे, यांच्यासह विद्यार्थीनी सहभागी होवून गीतगायन केले.

दिनांक ७ मे २० २ ६ रोजी रविंद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी करण्यात आली. तर दिनांक ६मे २० २६ रोजी राजर्षी शाहू महाराज पुण्यातिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

### कुंबेफळ येथील सिद्धिविनायक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९४.२३ टक्के



शिंदे श्रावणी महादेव द्वितीय



शिंदे पूनम प्रथम



समीक्षा थोरात विलास तृतीय



रुपाली थोरात दत्तात्रय चतुर्थ



शुभम सिरसट संजय चतुर्थ



चटप सुजाता हनुमंत पाचवी


**केज/प्रतिनिधी:** लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ,केज संचलित सिद्धिविनायक विद्यालय, कुंभमेळ ता.केज या विद्यालयाचा एस.एस.सी. मार्च २०२६ चा निकाल ९४.२३ टक्के लागला आहे एकूण ५२ विद्यार्थ्यांपैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. सिद्धिविनायक विद्यालयाने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये विशेष प्राविण्य सह २६ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत १५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ७ विद्यार्थी आणि तृतीय श्रेणीमध्ये १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्वप्रथम कु. पुनम लिंबराज शिंदे ९१.०० टक्के, द्वितीय कु. श्रावणी महादेव शिंदे ९०.४० टक्के, तृतीय कु.समीक्षा विलास थोरात८८.६० टक्के, कु.रूपाली दत्तात्रय थोरात८८.०० टक्के, चि. शुभम संजय सिरसट ८८.०० टक्के, कु. सुजाता हनुमंत चटक ८६.८० टक्के या विद्यार्थ्यांनी गुण मिळविले आहेत. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी.एम.बोबडे, उपाध्यक्ष एम.के.कदम, सचिव डॉ.आय.एन.महाकुंडे, शाळेचे मुख्याध्यापक एस.एस.सपाटे, माजी मुख्याध्यापक बि.डी. डिसले,जे.बी. थोरात यांच्यासह शाळेचे सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी आणि पंचक्रोशीतील नागरिक यांनी पालक व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### लहान मुलांवर अत्याचार करणाऱ्यांना खरंतर भररस्त्यात शिक्षा करायला हवी

मुंबई : पुणे जिल्ह्यातील नसरापूर या ठिकाणी एका चार वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार केले, त्यानंतर तिची निर्घृण हत्या केली. १ मे रोजी घडलेल्या या भीषण प्रकारानंतर या नराधमाला पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना समोर आल्यानंतर नरसापूरचे ग्रामस्थ आणि पीडितेचं कुटुंब प्रचंड संतप्त झाल्याचं पाहण्यास मिळाले होते. याबरोबरच राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत अशून अरोपीला फाशीची शिक्षी व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# आंबेडकरी चळवळीचे राजकीय वारसदार





आंबेडकरी विचारांची क्रांतिकारी राजकीय चळवळ राज्यातच नव्हे तर देशात दिशाहीन झाली आहे. आंबेडकरी विचारांच्या राष्ट्रीय नेत्या मायावती दलित आहेत की बौद्ध?. देशाचे राष्ट्रपती दलित एस सी. मुस्लिम आणि आदिवाशी झाले.पण आंबेडकरी विचारांचे नव्हते.महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली व इतरांना दिले ज्यांनी घेतली त्यांनी आपली ओळख जपली त्यानुसार आचरण केले,त्यामुळे त्यांच्यात क्रांतिकारी बद्दल झाला.मागासवर्गीय बौद्ध झाले,नंतर बहुजन नंतर मूलनिवासी २०१८ नंतर वंचित झाले त्यामुळेच राज्यातील वंचित बहुजन समाजाच्या घराघरातील माणसाच्या मेंदूत आज ही आपली ओळख कायम असावी अशी अपेक्षा आहे.गेल्या वर्षी वंचित बहुजन आघाडीच्या तुफान जाहीर सभानी सर्व बहुजन समाजातील राजकीय गटबाजी जवळ जवळ संपल्यात जमा होती. त्यामुळेच आंबेडकरी चळवळीचे राजकीय वारसदार एकमेव बाळासाहेब उर्फ प्रकाश यशवंतराव आंबेडकर ठरले होते. आंबेडकरी चळवळीचे खरे रक्ताचे वारसदार ते आहेतच. पण आपण खऱ्या अर्थाने वैचारिक चळवळीचे राजकीय वारसदार झाले पाहिजे अशी अपेक्षा आज ही कायम आहेच.

बाळासाहेब आंबेडकरांच्या राजकीय भूमिकेमुळे राजकीय समीकरण बदलली होती. तो बदल समाजवादी,डाव्यांना जवळ धरून झाला नव्हता.केवळ प्रसिद्धी मिळत होती. तेच हवा निर्माण करीत होते. हे सर्वच मान्य करतात.तो बदल काही अर्थाने आता खऱ्या अर्थाने पूर्ण झाला असे म्हणता येईल.आणि लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर तो आणखी स्पष्ट झाला.मागासवर्गीय समाजातील लोक बहुजन म्हणूनच जवळ आले. विशेष बुलढाणा, अकोला वाशीम जिल्ह्यातील बौद्ध समाजावर होणारे हल्ले,अन्याय,अत्याचार करणारे कोण आहेत हे पाहिल्यावर,आपले एकूण संघटन,बौद्ध महासभा,भारिप बहुजन महासंघ आणि डाव्या चळवळीशी असलेला घरोबा कुठे तरी कमी पडतो असे वाटत होते.त्याचे सत्यशोधक पद्धतीने आत्मपरीक्षण करून त्यातील काही प्रश्न आपल्या वाढदिवसा निमित्य आपल्या भक्त आणि शिष्या समोर मांडण्याचा हा प्रयत्न मी दरवर्षा प्रमाणे यावेळी ही करतो. सत्यशोधक चळवळीचा कार्यकर्ता म्हणून समाजाबद्दल चळवळी बद्दल जी चिंता वाटते ते शब्दबद्ध करून मांडण्याचा प्रयत्न करतो. कारण आंबेडकरी चळवळीत अनेक बुद्धिव ादी,विचारवंत,लेखक,पत्रकार,साहित्यिक आहेत. पण त्याच्या मध्ये एका गोष्टीचा अभाव आहे. तो म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता त्याच्यात नाही. सत्य मांडल्यावर समाज काय म्हणेल?. कोण काय करेल ?. बहुसंख्येने असलेला भक्त,समाज नाराज होईल.याची त्यांना भिती वाटते. म्हणून ते सत्याला सत्य म्हण्यास लिहण्यास घाबरतात. हे आपणच (विचारवंतां कडून अपेक्षा-आंबेडकर चळवळ संपली आहे.पण नंबर ३६ वर ) म्हटले आहे. त्यामुळे हा नियम मला लागू नाही.कारण मी प्राध्यापक,वकील,इंजिनियर,साहित्यिक,विचा रवंत नाही. एक असंघटित कामगारांना संघटित करता करता संघटित कामगार चळवळीत काम करणारा कार्यकर्ता नेता आहे.आणि अब्राम्हणी सत्यशोधक मासिकातून लिहता लिहता वृत्तपत्रात पत्रलेखन लिहायला लागलो.क्रांतिकारी विचारांच्या चळवळीची दिशा व दशा यावर सत्य शोधक नजरेतुन चिंतन आणि परीक्षण करून लिहायला लागलो.परिणामाची पर्वा न करता. कारण नेत्या पेक्षा,पक्ष संघटना मोठी असते,पक्ष संघटना पेक्षा विचारधारा.पण आज नेता सर्वांपेक्षा मोठा झाला आहे.म्हणूनच अनुसूचित जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याच्या निर्णय घेण्याचे कटकरस्थान जोर शोरने सुरू आहे.

प्रकाश आंबेडकर यांचा जन्म १० मे १९५४ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे प्रकाश हे नाव त्यांचे आजोबा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ठेवलेले होते. १९७२ मध्ये ते मुंबईतील सेंट स्टॅनीसलायस हायस्कूल मधून दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर इ.स. १९७८ मध्ये त्यांनी सिद्धार्थ महाविद्यालय वडाला येथे बी ए पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे इ.स. १९८१ मध्ये त्यांनी सिद्धार्थ विधी महाविद्यालयात एल एल बी पदवी मिळवली होती.समाजकारण,धम्मकारण आणि राजकारण यांचे वातावरण त्यांच्या घरात कायमस्वरूपी होते. सम्यक क्रांती आंदोलन,गांव तिथे भारतीय बौद्ध महासभा आणि भूमिहीन शेतमजुरांच्या प्रश्नासाठी जनजागृती आणि आंदोलन १९८२ पासुन सुरु केले होते.गायरान,पडीत,वनविभागाच्या जमीन ताब्यात घेऊन कसायला लावून शेतमजुरांचे अल्पभूधारक शेतकरी केले. त्याच्या त्या कसलेल्या जमिनी नांवावर (सातबारा) करण्यासाठी ''भूमिहीन हक्क संरक्षण समिती स्थापन'' केली होती. त्यामुळे बाबासाहेबाच्या लढ्यातील एका सेनापतीच्या अर्धवट राहिलेल्या लढ्याला आपण एक वेगळी दिशा देण्याचे काम हाती घेतले होते. ''कसेल त्याची जमीन नसेल त्याचे काय?.'' या घोषणेने राज्यच नव्हे तर संपूर्ण देश ढवळून निघाला होता.तोच धागा पकडून आपण राजकारण नको समाजकारण हवे त्याच्या समाज परिवर्तनातून राजकारण करू असाही आपला संकल्प होता. त्यामुळे राज्यातील नव्हे तर देशातील मागासवर्गीय, शोषित,पिडीत,आदिवाशी समाज तुम्हाला अंधार नष्ट करणारा नवा सूर्य प्रकाश म्हणत होती.सूर्याची किरण वरून खाली येतात. लोकसभा,विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीमुळे उगवत्या सूर्याचा प्रकाश घरात नव्हे तर मेंदूत गेला होता. त्यामुळेच इतर पक्षात काम करणारा कार्यकर्ता व मागासवर्गीय,ओबीसी,शोषित, पिढीत भटक्याविमुक्त समाज जवळ आला होता. निवडणुकीतील अनुभवा नंतर तो किती सोबत राहिला यांची माहिती संघटना बांधणी मुळे होऊ शकते.

आदरणीय ऍड.बाळासाहेब आंबेडकर भारिप बहुजन महासंघाचे राष्टीय अध्यक्ष झाल्यावर ''माझा पक्ष,माझी सत्ता'' घोषणा दिली.आणि मी आंबेडकरी चळवळीतील राजकीय निळ्या आकाशातील चमकणारे तारा आहे.हे दाखवून दिले.ज्या डॉ. बाबासाहेबाच्या रक्ताचे आपण वारसदार आहेत.त्या बाबासाहेबानी आपले आयुष्य अस्पुष्य समाजाला धार्मिक,सामाजिक,शैक्षणिक आणि राजकीय अधिकार मिळवून देण्यासाठी खर्ची केले.त्यासाठी त्यांनी अनेक राजकीय सामाजिक शैक्षणिक संस्था, संघटना,पक्ष निर्माण केल्या. त्याची सुरवात त्यांनी ''बहिष्कृत हितकारणी सभा '' स्थापन करून केली.पुढे त्याचा विस्तार करत ''समाज समता संघ '' उभा केला.राजकीय क्षेत्रात आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला.भारतदेश हा कृषी प्रधान आहे ७० टक्के लोक शेतीवर मजुरी करून जगतात.त्यातील ८५ टक्के समाज हा बहुजन समाजातील आहे.म्हणजे अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त भटक्या जाती, इतर मागासवर्गीय,आदिवाशी समाजातील लोक आहेत. हे सर्व असंघटीत कामगार मजूर आहेत. त्यासाठी स्वतंत्र मजदूर युनियन ची स्थापना केली होती. अनुसूचित जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याच्या विरोधात भांडणारे सर्व सरकारी सार्वजनिक उद्योग धंद्यात कंत्राटी पद्धतीने होत असतांना कोणत्या ट्रेड युनियनचे सभासद होते?. तेव्हा सेवा निवृती च्या जागा कंत्राटी पद्धतीने भरल्या तेव्हा यांनी का विरोध केला नाही. त्यावेळी आरक्षण संपविल्या जात आहे हे कसे कळले नाही.त्यावेळी क्रांतिकारी विचाराची आंबेडकरी ट्रेड युनियन का आठवली नाही.

आज असंघटीत कामगार मजूर हे गांधीव ादी,लोहियावादी,गोळवलकरवादी, मार्क्सवादी कम्युनिस्ट, लाल बावटा यांच्या इंटक,आयटक,बी एम एस, सिटूचे अधिकृतरीत्या सभासद आहेत. तरी ही हे सर्व भारिप बहुजन महासंघाचे किंवा वंचित आघाडीचे जातीमुळे अधिकृत सभासद असणारच. त्याच्या साठी बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून राजकीय हक्क्चे व्यासपीठ निर्माण केले होते. तो पक्ष ते विचार आज कोणाकडेच जिवंत राहिलेला नाही. तेच अपूर्ण काम आपण नव्या दमाने नवीन समीकरण जुळवून वंचित बहुजन आघाडीच्या नांवाने नवीन दमाची दुसऱ्या तिसऱ्या फळीतील नेत्यांना कार्यकर्त्यांना सोबत घेऊन दमदार घौडदौड केली होती.ते आता ही आपल्या सोबत राहिले असतील ही अपेक्षा आहे.

बाळासाहेब मागासवर्गीय बहुजन समाज हा सर्वात मोठा असंघटीत कामगार आहे. आज त्याची संख्या सरकारी ९३ टक्के आहे.त्याचा विकास आणि कल्याण करण्यासाठी अनेक योजना आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी,कल्याणासाठी विकासासाठी राज्य व केंद्रात ज्या योजना कायदेशीर रित्या बनवुन देशाला अर्पण केला आहेत.त्यांची अंमलबजावणी कुठेही प्रामाणिकपणे होताना दिसत नाही. सर्व प्रशासकीय व राजकीय दलाल त्या ओरबडून खातात त्यामुळेच प्रचंड प्रमाणात निधी येतो आणि तो कागदावर खर्च होतो. म्हणूनच मागासवर्गीय समाजाचा विकास आणि परिवर्तन कुठेही दिसत नाही.परंतु या योजनाचा लाभ घेऊन प्रत्येक मागासवर्गीय ओबीसी समाजात दलाल,चमचे कार्यकर्ते,नेते आर्थिकदृष्ट्या मजबूत निर्माण झाले आहेत.वंचित आघाडीमुळे त्यांची किंमत वाढलेली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे स्वप्न होते की माझा समाज सत्ताधारी जमात व्हावा.महाराष्ट्रातील आजची राजकीय वर्तमान स्थिती पाहता रिपब्लिकन पक्षातील फुट एकजातीय आहे. केवळ सर्व बौद्ध समाज एकत्र आला तर राजकीय टक्केवारी पाहता सत्ताधारी बनू शकत नाही.पण सर्व बौद्ध समाजातील आंबेडकरी गट एकत्र आले तर एकच गट मजबूत होऊ शकतो.त्याची एकी पाहून इतर मागासवर्गीय, ओबीसी, आदिवाशी, अल्पसंख्याक, भटक्या समाजातील लोक या पक्ष कडे आकर्षित होऊ शकतात.त्यासाठी एक विश्वास पात्र नेत्याची गरज होती.आणि ते फक्त बाळासाहेब आंबेडकर असु शकतात.त्यासाठी त्यांनी दूरदर्शी व धोरणी, मुत्सद्दी पणा दाखविणे अपेक्षित होते.वंचित बहुजन आघाडीने लोकसभा निवडणुकीत प्रभाव दाखविला.पण तो विधानसभा निवडणुकीत पाहिजे त्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही.आणि यांच असंघटित कष्टकरी शेतमजूर कामगारांनी आणि सुशिक्षित स्वार्थी आरक्षणाच्या लाभार्थींनी अपेक्षाभंग केला आहे.यासाठी पुढे संघटनात्मक बांधणी अपेक्षित आहे.

विद्यार्थी दसे पासून ज्यांनी आंबेडकरी चळवळीत अन्याय अत्याचार विरोधात संघर्ष केला.आणि सत्ते जवळ गेले ते आता एवढे लाचार झाले की त्यांनी १९५७ ते १९७२ च्या लाचार रिपाईची जागा भरून काढली. त्यांचे चिलेपिले प्रत्येक जिल्ह्यात आहेत. वंचित बहुजन आघाडी च्या झंझावातात ते समाजाला शरण आले.जे नाही आले त्यांना समाजाने बाहेर काढले. त्यामुळेच आता आंबेडकरी चळवळीतील गटबाजी संपल्यात जमा आहे.इतिहास असे सांगतो की २१ जानेवारी १९४९ रोजी औरंगाबादला झालेल्या कार्यकमात बाबासाहेब आपल्या अनुयायांना उदेशून सांगतात. जो पर्यंत तुम्ही तुमची मजबूत संघटना जगाला इतर समाजाला दाखवत नाही तो पर्यंत तुमच्यावर असे अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होतच राहतील. म्हणून दुसऱ्यावर अवलंबून राहू नका. स्वताची ताकद निर्माण करा.मग पहा तुम्हाला कोण त्रास देतो. तुमच्यावर हल्ला करण्यासाठी त्यांना शंभर वेळ विचार करावा लागेल. बाळासाहेब आज जो तो नेता संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष आहे. त्यांना त्याची मर्यादा आपण दाखवू शकता. पण त्यासाठी स्वताला लोकशाही सर्व संविधान मान्य करावे लागेल.प्रत्येक नेत्याला त्याचा मतदार संघ वाटून द्या इतर जिल्ह्यात मतदार संघात ढवळाढवळ करण्याचीही कोणालाही गरज नाही. आपण लिहता की आंबेडकरी चळवळीचा व आंबेडकरी विचाराचा माणूस मोठ्या प्रमाणत मुंबई,नांदेड,विदर्भातील बुलढाणा,अकोला,भ डारा,गोंदिया,चंद्रपूर, नागपुर,गडचिरोली असे काही आंबेडकरी जिल्हे आहेत. तिथे आंबेडकरी विचारधारेची माणस घडविण्याची गरज आहे. (आंबेडकरी चळवळ संपली आहे,पान ४१/४२ )

ऍड.बाळासाहेब आंबेडकर उर्फ प्रकाश आंबेडकर यांच्यावर लिहणे म्हणजे खूप मोठी जोखीम असते.त्याच्या भक्तांना त्याच्या बाबत खरे लिहणे पसंत पडत नाही. प्रकाश यशवंत आंबेडकर हे आंबेडकरी चळवळीतील एक तरुण तडपदार नेतृत्व म्हणून प्रसिद्ध आहेत,पण त्याच बरोबर ते अत्यंत अभ्यासू, दूरदर्शी व धोरणी,मुत्सद्दी नि परिवर्तनवादी म्हणून ही त्यांची ख्याती आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ते नातू असल्यामुळे सर्व समाज त्यांचा खूप आदर करतात. पण त्या पलिकडे जाऊन त्यांनी वंचित बहुजन आघाडी मुळे एक स्वतंत्र राजकीय प्रस्थ म्हणून त्यानी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.राजकारणात व समाजकारणात मोठी मजल मारली.पण ती कायमस्वरूपी टिकविता आली पाहिजे.ते कौशल्य बाळासाहेब यांच्यात नाही असे राजकीय जाणकार म्हणतात.कारण पक्ष संघटना बाधणीत कोण कुठे? पदाधिकारी चुकीचा वागला त्यावर समीक्षा होऊन कारवाई झाली पाहिजे,ते होतांना दिसत नाही. प्रत्येक मतदारसंघात आपले पदाधिकारी त्याचे कुटुंबातील एकूण मते किती होतात. ते कुठे गेले. ही समीक्षा झाली पाहिजे.

अकोला जिल्ह्यात राजकीय आदर्श घालून दिला होताच.एकमेव नेता असा आहे कि ज्याचा स्वताचा मतदार संघ आहे.बाकी सर्व आंबेडकरी चळवळीतील राजकीय नेते उंटावरचे शहाणे आहेत.जे स्वताला राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष म्हणून घेतात पण वीस वर्षात स्वताचा मतदार संघ बांधू शकले नाहीत. म्हणूनच बाळासाहेब आंबेडकर हे आंबेडकरी चळवळीचे खरे राजकीय वारसदार ठरतात आणि आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांचे वारसदार कोणी नाही. कारण त्यांनी आमच्या आईवडील आजोबांना १४ ऑक्टोबर १९५६ बुद्ध धम्माची दीक्षा देऊन बौद्ध बनविले होते.३ ऑक्टोबर १९५७ त्यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ही राजकीय ओळख दिली होती.१९७२ ला नामदेव ढसाळ,राजा ढाले,ज.वी.पवार यांनी दलित पँथर कडून पुन्हा दलित बनविले. मान्यवर कांशीराम यांनी १९८२ डी एस फोर आणि १४ एप्रिल १९८४ ला बहुजन समाज पार्टी ची स्थापना केली.मान्यवर कांशीराम यांनी बहुजन समाज ही ओळख निर्माण केली. बामसेफ वाल्यांनी विशेष वामन मेश्राम यांनी बहुजनांना मुलनिवासी बनविले.या सर्वांची ओळख पुसून काढून २० मार्च २०१८ ला बाळासाहेब उर्फ प्रकाश यशवंतराव आंबेडकर यांनी वंचित समाज ही राजकीय ओळख निर्माण केली.

१९५६ ते २०२० या काळातील एकूण शैक्ष णिक,सामाजिक,सांस्कृतिक,कला क्रिडा, धार्मिक आणि राजकीयदृष्ट्या जेवढे जागृत आहेत तेवढा इतर कोणताही समाज जागृत नाही.त्यामुळे आम्ही कशाने ही वंचित आहोत आणि नाही हे सिद्ध होत नाही. आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधान नुसार वागत नाही हे मात्र वेळोवेळी सिद्ध होते.मी म्हणतो ८५ टक्के मागासवर्गीय ओबीसी बहुजन,आदिवाशी अल्पसंख्याक शेवटी वंचित ५० टक्के संघटीत झाला तर ४२.५ टक्के होते.देशातील ९३ टक्के असंघटीत कामगार मजूर ५० टक्के संघटीत झाला तर ४६.५ टक्के होतो.हा सर्व समाज असंघटित कामगार मजूर आहे.हा प्रत्येक निवडणुकीत शंभर टक्के मतदान करतो.पण तो मत दान करत नाही?. विकतो!,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते ज्या दिवशी यांना यांच्या मतदानाची किंमत समजेल तेव्हा तो सत्ताधारी असेल. मान्यवर कांशीराम यांनी उत्तर भारतात न बिकनेवाला समाज बनविला तेव्हा लखनऊ स्टेशनवर तीन चाकी रिक्षा चालविणारा अब्दुल रहमान आमदार झाला. बाळासाहेब आंबेडकर यांनी किनवटला भिमराव केराम यांना आमदार बनविले,पक्षासाठी प्रमाणिक पणे काम करणाऱ्या गरीब कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली तर समाज त्याला एक व्होट एक नोट देतो हा इतिहास मान्यवर कांशीराम व बाळासाहेब आंबेडकरांनी लिहून ठेवला आहे. जेव्हा उमेदवारी विकली जाऊ लागली तेव्हा पासुन कार्यकर्ता ही विकला जातो,तो समाजाला विक्री करण्यासाठी तयार करतो.हे आंबेडकरी विचारांच्या राजकीय पक्षात थांबले पाहिजे.तरच आपण राजकीय परिवर्तन घडवून आणू शकतो.

असंघटीत कामगार मजूर यांना काय पाहिजे अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण आरोग्य आणि रोजगार भारतीय संविधान यांना हे सहा मुलभूत अधिकार देण्यासाठी कटिबंध आहे. यांच्या साठी आपण काय काम करतो?. कोरोना महामारीच्या संकटात देशभरात राज्यातील शहरात हा लाखोंच्या संख्येने सैरभैर फिरणारा कामगार कोण होता?.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात जो बोगस नांव नोंदणी होऊन कल्याणकारी निधीचा वाटप होत आहे. तो खऱ्या कष्टकरी बांधकाम कामगारांवर अन्याय आहे. याबाबत कोणता ही राजकीय बोलत नसतांना आपण लक्ष घालून बोलण्याची कष्टकरी बांधकाम कामगाररांची अपेक्षा होती.कारण महात्मा फुले,नारायण मेघाजी लोखंडे,राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव दादासाहेब गायकवाड यांचा कोणता वैचारिक वारसा आपल्या चळवळीकडे आहे?. कसेल त्यांची जमीन,नसेल त्यांचे काय?. राहील त्यांची जागा घर,नसेल त्यांचे काय?. खेडे सोडून शहरात गेलेले बहुसंख्येने लोक कोण आहेत?. त्यांची नांव नोंदणी कामगार कायद्या नुसार गांवात आणि जिथे काम करतो तिथे होणे आवश्यक असतांना यावर आपण आपल्या पक्षाचे कार्यकर्ते बोलणे अपेक्षित होते.पण कोणीच बोलत नाही.इतर बोलणार नाहीत कारण त्यांचे आर्थिकहित संबंध त्यात गुंतलेले आहेत.या समस्येवर बाळासाहेब आपण बोलणे अपेक्षित आहे,पत्रकार परिषदेत मांगणी व आवाहन केले म्हणजे जबाबदारी संपत नाही. त्यांचा पाठपुरावा करणारी कार्यकर्त्यांची प्रशिक्षण घेतलेली प्रशिक्षित फळी निर्माण झाली पाहिजे.असंघटीत कामगार मजूरांच्या दररोजच्या जीवन मरणाच्या या प्रश्नावर आपण सतत किर्याशील राहिलो तर या असंघटीत कामगार मजूरांना मतदान मागण्याचा अधिकृतपणे अधिकार आपल्या पक्षाला असेल.आपण खऱ्या अर्थाने वैचारिक चळवळीचे राजकीय वारसदार झाले पाहिजे अशी अपेक्षा सर्वच समाजाची आज ही कायम आहेच. म्हणूनच हा लेखप्रपंच आंबेडकरी चळवळीचे राजकीय वारसदार बना!. हीच अपेक्षा,आपले आरोग्य निरोगी राहून आपल्या हातून प्रेरणादायी लक्षवेधी कार्य घडो.आपल्या ७२ व्या वाढदिवसा निमित्ताने आपणांस माझ्या कडून व माझ्या लोकप्रिय दैनिकाकडून हार्दिक शुभेच्छा,



आपला

**सागर रामभाऊ तायडे**

९९२०४०३८५९.भांडूप मुंबई

अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन.

# लातूर बाजार समितीत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करा

## ▌माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे निर्देश
## ▌नव्या मार्केट यार्डच्या उभारणी बाबत आढावा बैठक





**लातूर/प्रतिनिधी** :शनिवार दि. ०९ मे २०२६ बदलत्या काळाच्या गरजा ओळखून नवीन मार्केट यार्डमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेतील शेतीमालाचे भाव कळण्यासाठी आणि निर्यातक्षम शेतीमाल उत्पादनासाठी योग्य मार्गदर्शन मिळेल, अशा सुविधा या ठिकाणी उभाराव्यात, असे निर्देश माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले.


लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालकांची बाजार समिती सभागृहात माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ९ मे रोजी बाजार समिती संचालकांसमवेत बाजारसमिती कामकाज आढावा बैठक घेतली. बाजार समितीच्या वतीने शेतकरी, तसेच व्यापारी, आडते, मुनीम, हमाल, मापाडी, गाडीवान, मजूर यांच्यासाठी राबवायच्या योजना व मार्केट यार्ड परिसरात उभाराव्याच्या सुविधा संदर्भात यावेळी विस्तृतपणे चर्चा केली.

प्रारंभी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाजार समिती संचालकाच्या समवेत लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली आणि त्यानंतर बाजार समिती इमारत पाहणी केली. या बैठकीत माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी लातूर एमआयडीसी परिसरात नव्याने उभारावयाच्या अद्यावत मार्केट यार्ड संदर्भात यावेळी विस्तृत चर्चा झाली, मार्केट यार्ड उभारणीसाठी मुदतवाढ घेऊन त्या ठराविक मुदतीत सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना याप्रसंगी त्यांनी दिल्या आहेत. यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले, बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन नव्याने उपलब्ध होत असलेले अद्यावत तंत्रज्ञानाचा या मार्केट यार्ड मध्ये करण्यात यावा, व्यापाऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन गाड्यांची उभारणी करावी, सेल हॉल बांधावेत, जगभरातील शेतीमालाचे भाव या ठिकाणी शेतकऱ्यांना कळावेत, जागतिक मागणी लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी कोणती पिके घ्यावीत आणि निर्यात योग्य शेतीमाल बाजारात आणण्यासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या सुविधा या ठिकाणी उभारण्यात याव्यात आदिसुचना याप्रसंगी देण्यात आल्या आहेत. दरम्यान माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी यावेळी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती मधील व्यापारी बांधवाशी देखील संवाद साधला.

यावेळी बाजार समिती सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, ललित भाई शहा, ॲड. किरण जाधव, ॲड. समद पटेल, विजय देशमुख, बालाजी वाघमारे, मयूर चित्ते, अनिल पाटील, सचिन सूर्यवंशी, बालाप्रसाद बिदादा, सुधीर गोजमगुंडे, अरविंद पाटील, श्रीराम शेळके, युवराज जाधव,पवन देशमुख, दीपक पाटील, दर्शन भोसले, दीपक नखाते, सुभाष घोडके, लक्ष्मण पाटील, बळवंत पाटील, शिवाजी देशमुख, अनंत पवार, शिवाजी कांबळे, आर्किटेक्ट सिद्दिकी, कंत्राटदार दिलीप माने, अजय गंभीरे यांच्यासह लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती पदाधिकार, सदस्य, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

### श्रेयश जाधव प्रथम, भक्ती गोरे द्वितीय तर यशराज आनेराव तृतीय






**बीड/प्रतिनिधी:** बीड शहराजवळील शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे. मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(एस.एस.सी.) परीक्षेचा निकाल आज दिनांक ८ मे रोजी जाहीर झाला. यामध्ये विद्यालयाचा शेकडा ९० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत चि. श्रेयश नवनाथ जाधव याने ९६.२० टक्के गुण मिळवत विद्यालयातुन प्रथम क्रमांक पटकावला. कु. भक्ती विलास गोरे हिने ९४.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. यशराज गणेश आनेराव याने ९३.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन करत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला.

तसेच कु. स्नेहल कमलाकर शिंदे हिने ९०.४० टक्के, चि. गौरव गणेश साळुंके याने ९०.२० टक्के, चि. मेघराज हौसराव मोरे याने ८९.०० टक्के, चि. रेहान शरीफ शेख याने ८८.६० टक्के, कु. जान्हवी बदाम पदमुले व कु. अमृता बाबू पाखरे यांनी प्रत्येकी ८५.६० टक्के, चि. रविराज पांडुरंग गावडे याने ८५.०० टक्के, चि. तानाजी सुभाष काळे याने ८३.०० टक्के गुण मिळवत विशेष यश संपादन केले. याशिवाय कु. श्रुती भाऊसाहेब कदम (८१.२०), चि. दीपक जयसिंग पाखरे (८०.६०), चि. नयन नथाराम घोडके (८०.६०), चि. कृष्णा राजेभाऊ सिरसाट (८०.२०), कु. अमृता रामप्रसाद साळुंखे (७९.८०), कु. आरोही अतुल भडगळे (७७.००), चि. ओंकार श्रीकृष्ण शिंदे (७५.६०), कु. रुपाली सचिन थोरात (७५.६०), कु. अलिशा असीम शेख (७४.४०), कु. रुपाली जालिंदर काळे (७४.४०), कु. ऋतुजा विठ्ठल पिंगळे (७३.८०), कु. प्रज्ञा सुनील पाखरे (७३.२०), चि. रोहन अशोक चव्हाण (७१.८०), चि. गणेश बाळू कुटे (७१.४०), कु. दिव्यानी राहुल डोंगरे (७०.६०), चि. गोविंद सचिन यादव (६९.६०) आणि चि. शिवम रंजीत कदम (६९.२०) यांनी ही उल्लेखनीय यश संपादन केले.

या विद्यालयातून विशेष प्राविण्यसह २० विद्यार्थी, प्रथम श्रेणी मध्ये २० विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणी मध्ये ०६ उत्तीर्ण झाले आहेत. एकंदरीतच विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे शिदोड आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ, सचिव श्री. नामदेवराव वाघ, शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दर्जेदार फळे व भाजीपाल्यात भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई होणार : पणन मंत्री जयकुमार रावल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकरी दर्जेदार फळे, भाजीपाला तसेच इतर शेतमालाचे उत्पादन करतात. मात्र, काही ठिकाणी फळांची गोडी वाढविण्यासाठी, कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी किंवा अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. अशा प्रकारे भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

यासंदर्भात ृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या तसेच थेट पणन व्यवस्थेद्वारे होणाऱ्या शेतमाल खरेदी-विक्रीमध्ये भेसळ आणि घातक रासायनिक प्रक्रियांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलली आहेत. त्यानुसार पणन संचालनालयाने राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या आणि थेट पणन परवाना धारकांना महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे.

पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला दर्जेदार शेतमाल ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण स्वरूपात पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. काही ठिकाणी फळे कृत्रिमरित्या पिकविणे, त्यांची गोडी वाढविण्यासाठी रसायनांचा वापर करणे, फळे व भाजीपाल्यांना कृत्रिम रंग देणे तसेच अन्नधान्य अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी बाजार समित्यांनी नियमित तपासण्या करून कठोर उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच भाजीपाला, फळे आणि अन्नधान्याच्या साठवणूक व वाहतुकीमध्ये कमी जाडीच्या प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरास प्रतिबंध करून पर्यावरणपूरक साहित्याच्या वापराला प्रोत्साहन देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. अन्नधान्य, फळे किंवा भाजीपाल्यामध्ये भेसळ अथवा घातक रसायनांचा वापर झाल्याचा संशय आल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाशी समन्वय साधून अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ अंतर्गत संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच भेसळ करणाऱ्या परवाना धारकांचे परवाने रद्द करण्याची कार्यवाहीही करण्यात येईल, असे मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले.राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या व थेट पणन परवाना धारकांनी शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करून ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही पणन मंत्री रावल यांनी केले.

# केज शहरातील भवानी चौकात पुन्हा विचित्र अपघात भवानी चौक ठरू लागला अपघाताला निमंत्रण

**केज/प्रतिनिधी:** केज शहरातील भवानी चौकात पुन्हा विचित्र अपघात घडला असून या अपघातामध्ये दांगट- पाटील यांच्या पेट्रोल पंपाच्या आवारात उभे असलेले दोन छोटे टिप्पर, पेट्रोल-डिझेलची वाहतूक करणाऱ्या टँकरवर सरकी पेंडीची वाहतूक करणारा १२ टायरी ट्रक भरधाव वेगात माजलगाव कडून केज कडे येणारा ट्रक भवानी माळापासून भरधाव वेगात आल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने शनिवारी रात्री २-०० वाजण्याच्या दरम्यान सदरील ट्रक हा भवानी चौकातील अरुंद रस्ता असल्याने व वेग मर्यादा जास्त असल्याने चालकाला वळण न घेता आल्यामुळे सदरील ट्रक हा सरळ दांगट- पाटील यांच्या पेट्रोल पंपात घुसला व दोन छोटे उभे असलेले टिप्पर व डिझेल-पेट्रोलची वाहतूक करणारा टँकर यावर धडकून पलटी झाला. यात सदरील ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्याचबरोबर दोन छोट्या टिप्परचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

हा अपघात शुक्रवार व शनिवार रोजी च्या मध्यरात्री २-०० वाजण्याच्या दरम्यान सदरील घटना घडली असल्याची माहितीही प्राप्त झालेले आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की,केज शहर हे खामगाव-पंढरपूर व अहिल्यानगर-अहमदपूर या दोन राज्य मार्गावरील शहर असून शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक व भवानी चौक असे प्रमुख दोन चौक असल्याने या दोन्हीही चौकामध्ये वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागत आहेत. दोन्हीही चौक वरदळीचे ठिकाण असल्याने तेथे सातत्याने मोठ-मोठे अपघात घडत आहेत.

दोन्ही चौकाचे विस्तारीकरण झाल्याने रस्ते अरुंद झाले आहेत.त्यातच चौकात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढलेले आहे. त्यामुळे खास करून धारूर-आंबेजोगाई रोडवरील भवानी चौक हा अपघाताला निमंत्रण ठरू लागला आहे. काल नुकत्याच घडलेल्या







विचित्र अपघाताच्या घटनेमुळे आंबेजोगाई-धारूर रोडवरील भवानी चौक पुन्हा चर्चेत आला आहे.

काल दिनांक ९ मे शुक्रवार व शनिवारच्या मध्यरात्री २-०० सुमारास धाराशिव जिल्ह्यातील कसबे तडवळा येथील मधुकर कानगे यांच्या मालकीचा अशोक लीलँड कंपनीचा १२ टायर असलेला ट्रक क्र.एम.एच.५० सी.३५७६ हा ट्रक माजलगाव येथून सरकी पेंड घेऊन केज मार्गे तासगावला जात असताना धारूर रोडवरील भवानी माळ ते भवानी चौक हा रस्ता अतिशय उत्तराचा असल्याने व गाडीत प्रचंड लोड असल्याने चालकाला गाडी नियंत्रित न करता आल्याने व केज शहरातील भवानी चौक अरुंद असल्याने केज शहराकडे रस्त्यावर वळण न घेता आल्याने दांगट-पाटील यांच्या पेट्रोल पंपात घुसून पेट्रोल पंपाच्या आवारात उभे असलेल्या दोन टाटा कंपनीचे छोटे टिप्पर ज्यांचा क्र.एम.एच.१२ के. पी.-९१६८ व एम.एच.३८ एक्स-३०५८ यांना धडक देऊन सदर ट्रक हा पलटी झाला तर दोन्ही मिनि टिप्पर मधील एक टिप्पर हे डिझेल पेट्रोलची वाहतूक करणारे टँकर क्रमांक एम.एच.४४-९३०३ यावर जाऊन आदळले आहे. सदरील अपघात हा रात्रीच्या वेळी घडल्याने मोठी जीवित हानी टळली आहे. सदरील अपघातामध्ये जीवित हानी झाली नसली तरी या घटनेतील ट्रकचा चालक हा किरकोळ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर या ठिकाणी होणारे वारंवार अपघात हे फक्त आणि फक्त या भवानी चौकाच्या विस्तारीकरणामुळे आणि अरुंद रस्त्यामुळे होत असल्याची माहिती सध्या जनतेतून मिळत असून हा चौक अपघाताला निमंत्रण ठरत असल्याचे बोलले जात आहे. सदर घटनेची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, गटनेते भाऊसाहेब गुंड हे घटनास्थळी उपस्थित राहून सदर घटनेची चौकशी केली असता उपस्थित नागरिकांनी हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्याकडे चौकाचा विस्तार कमी करण्याची मागणी लावून धरली व आजपर्यंत भवानी चौकात झालेले सर्व अपघात हे विस्तारित चौक व अरुंद रस्त्या मुळे झाले आहेत असा प्रश्न चर्चेदरम्यान नागरिकांनी उपस्थित केला.

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महाम ार्गावर भीषण अपघात; पाच जण गंभीर

मुंबई : मुंबई-गोवा राष्ट्रीय महाम ार्गावर भरणेनाका येथे शनिवारी सकाळी भीषण अपघाताची घटना घडली आहे. या भीषण अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले आहे. जखमींवर सध्या उपचार सुरु आहेत. हा अपघात सकाळी साडेसातच्या सुमारास घडला. मुंबईहून गोव्याकडे जाणारी आराम बस प्रवासी उतरवण्यासाठी भरणेनाका येथे थांबली होती, दरम्यान पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या स्विफ्ट कारने बसला जोरदार धडक दिली आणि भीषण अपघात घडला.

या धडकेत कारचा समोरील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. अपघात इतका भीषण होता की, कार मधील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. अपघातामुळे काही काळ घटनास्थळी एकच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक तातडीने मदतीसाठी धावून आले. जखम ींना तात्काळ बाहेर काढून रुग्णवाहिकेतून उपचारासाठी पाठविण्यात आले.

जखमींची नावे

अपघातात प्रतीक्षा परशुराम खेराडे (वय ४८), शिल्पा परशुराम खेराडे (वय ५०), जनार्दन खेराडे (वय ४०), परशुराम गुणाजी खेराडे (वय ६०, सर्व रा. संगम ेश्वर) तसेच अर्जुन धोंडीबा चाळके (वय ३०, रा. सातारा) हे गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तत्काळ कळंबणी येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. यापैकी परशुराम खेराडे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात हलविण्यात आले असून उपचार सुरु आहेत.

# सलग दुसऱ्या दिवशीही अतिक्रमण हटाव सुरूच; गोलाई परिसरातील ग्रीन बेल्ट केला खुला

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने गुरुवारी (दि. ७ ) सुरू करण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम शुक्रवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच होती. शुक्रवारी गोलाई परिसरातील ग्रीन बेल्टही खुला करण्यात आला.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या निर्देशानुसार उपायुक्त वसुधा फड यांनी अतिक्रमण हटाव मोहिमेचे नियोजन केले आहे. गुरुवारी गोलाई परिसरातील जवळपास ३०० अतिक्रमणे हटविण्यात आली होती.शुक्रवारी लोखंड गल्ली,मलंग गल्ली, गंजगोलाईतील ग्रीन बेल्ट, मुख्य रस्ता तसेच आजूबाजूच्या परिसरातील अतिक्रमणावर मनपाने हातोडा मारला.यामुळे गजबजलेल्या गंजगोलाईतील रस्ते मोकळे झाले.अतिक्रमणे हटल्यामुळे पादचाऱ्यांना





चालण्यासाठी जागा उपलब्ध झाली.

अतिक्रमणे हटविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालये आणि अतिक्रमण हटाव विभागाची एकूण पाच पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांनी दुसऱ्या दिवशीही सकाळपासूनच धडाकेबाज कारवाई करत अतिक्रमणे काढली.

अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे. व्यापारी व व्यावसायिकांनी अतिक्रमणे करू नयेत.यापुढे अतिक्रमणे करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

दरम्यान अतिक्रमण हटाव मोहिमेचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. अतिक्रमणे काढल्यामुळे रस्त्यांची मूळ रुंदी स्पष्टपणे दिसून येत आहे. अतिक्रमणे काढली तर वाहतूक कोंडीची समस्याही दूर होणार आहे, अशा प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त केल्या जात आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.